## निशाणी क्र.५७ वरील आदेश

१. वादीने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्र दुरुस्तीकरीता दाखल केले आहे. वादी यांनी सदरचा दावा हा वाटपाकरीता व हक्क स्थापनेकरीता आणला आहे. सदरकामी ज्या मिळकती वाटपास पात्र आहेत. ज्या एकत्र कुटुंबाचे मिळकती आहेत. ते वादीने दावेकामी आणले आहेत. प्रतिवादी नं.५ याने आपल्या कैफियतीत काही मिळकती समाविष्ठ केले नसलेचे कथन केलेले आहेत. मौजे पात्रेवाडी ता. आटपाडी येथील गट नं.४८२ क्षेत्र ०–३२ आर पो.ख. ०–०२ आर एकुण क्षेत्र ०–३४ आर ची मिळकत यापैकी प्रतिवादी नं.१ चे नावे एकदम अल्प हिस्सा आहे.

२. तसेच गट नं.२१४ क्षेत्र ०–६६ आर पो.ख. ०–०७ एकुण ०–७३ आर तसेच "ब–३" असे घालुन त्यापुढे मौजे शेटफळे ता. आटपाडी जि. सांगली येथील गट नं.३८४ क्षेत्र ०–१३ आर आकार रु.०–४४ पैसे. यात वादीप्रमाणे घराण्याची हिस्स ० हे. ०.४२ आर यामध्येही अत्यंत अल्प हिस्सा आहे व तो अत्यंत अल्प हिस्सा असल्याने वादीने आपला हक्क प्रतिवादी नं.१ यास तोंडी पुर्वीच सोडुन दिलेला आहे. यामुळे सदर मिळकत वाटप कामी आणली नाही. तरी तांत्रिक अडचण राहु नये म्हणुन दावेकामी दुरुस्तीने आणणे जरुरीचे आहे ते खालीलप्रमाणे–

दावा कलम ब यामध्ये "ब–१" असे घालुन त्यापुढे मौजे पात्रेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली येथील गट नं.४८२ क्षेत्र ०–३२ आर पो.ख. ०–०२ आर

एकुण ०–३४ आर आकार रु. ०–९४ पैसे.

तसेच "ब–३" असे घालुन त्यापुढे मौजे शेटफळे, ता. आटपाडी जि. सांगली येथील गट नं.३८४ क्षेत्र ०–१३ आर आकार रु.०–४४ पैसे. यात वादीप्रमाणे घराण्याची हिस्सा ० हे. ०.४२ आर असे दुरुस्तीने लिहीणेस परवानगी असावी.

तसेच दावा कलम ६ मध्ये कसलीही दाद मागितलेली नाही. या शब्दापुढे "दावा कलम ब–१, ब–२ व ब–३ मिळकतीमधील वादीने प्रतिवादी नं.१ यांचा अत्यंत अल्प हिस्सा असलेने आपला हिस्सा प्रतिवादी नं.१ यांना वादीने सोडुन दिलेला आहे. त्यामुळे त्यामध्ये वादी यांना हिस्सा मागणेचे नाही. दावेमध्ये कसलीही तांत्रिक अडचण राहु नये म्हणुन त्या वाटपकामी सामील केले आहेत." असे दुरुस्तीने लिहीणेस परवानगी असावी.

दावा कलम ९ कोर्ट फी कररीता यामध्ये "कोर्ट फी रु.२००/– ची लावली आहे." या शब्दापुढे "दावा कलम ब–१, ब–२ व ब–३ या यामधील वादीने आपला हिस्सा पुर्वीच सोऊन दिलेने व त्यामध्ये वाटप मागितले नसल्याने त्यावर कोर्ट फी लावली नाही." असे दुरुस्तीने लिहीणेस परवानगी असावी.

**३.** दावा वाटपाचा असल्याने सदरची दुरुस्तीमुळे दावेच्या स्वरुपात कसलाही बदल होत नाही. तरी न्यायाचे दृष्टीने वरील दुरुस्तीस परवानगी असावी अशी विनंती केली.

४. प्रतिवादी नं.५ यांनी सदर अर्जास आक्षेप घेऊन आपले म्हणणे नि.६१ वर दाखल केले. त्यांच्या म्हणण्यानुसार वादी यांचा दावा दुरुस्ती अर्ज व त्यामधील संपुर्ण मजकुर धादांत खोटा व लबाडीचा असुन तो या प्रतिवादीस मुळीच मान्य नाही कबुल नाही. वास्तविक पाहता वादीने दावा मिळकतीमध्ये मिळकतीच्या वर्णनात सदरचे गट समाविष्ट केले असल्याने त्यावर कायद्याने कोर्ट फी देणे क्रमप्राप्त आहे. तसेच त्यावर योग्य ती होणारी कोर्ट फी देणे व त्याअनुषंगे दुरुस्ती करणे कायद्याने क्रमप्राप्त आहे. मात्र वादीने तसे न करता सदरचे गट समाविष्ट करणेबाबत मागितलेली दुरुस्ती ही कायद्याने चालु शकत नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा. याकामी पाहीले गेले तर वादीचा दावा हा वाटपाचा आहे. वादीने जर पुर्वीच काही गटातील मिळकती पुर्वी सोऊन दिल्याचे कथन केले तर वादीचे पुर्वीच वाटप झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अशा प्रकारची दुरुस्ती कायद्याने मागता येत नाही. सबब ती खर्चासह नामंजुर करणेत यावी.

५. याकामी प्रतिवादींचा बचाव खोडुन काढणेसाठी व्हेग स्वरुपाची दुरुस्ती वादीला कायद्याने मागता येत नाही. सदरची दुरुस्ती ही व्हेग स्वरुपाची आहे. वादीला या समाविष्ट केलेल्या गटामध्ये वाटप मागायचे नसल्यास वादीने एका ओळीत त्याबाबत प्लिडींग करणे क्रमप्राप्त होते. मात्र दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये वादी जर दुरुस्ती मागत असेल व त्याअनुक्रमे काही गट दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये समाविष्ट करीत असेल तर त्यास कायद्याने कोर्ट फी देणे भाग पडते. मात्र वादी अशा प्रकारची दुरुस्ती मागत नाही. वादी हा एके ठिकाणी कोर्ट फी देत नाही व त्याचठिकाणी दावा

मिळकतीच्या वर्णनामध्ये दुरुस्ती मागतो. यावरुन वादीने मागितलेली दुरुस्ती ही कायद्याने मंजुर करता येत नाही. सबब या व वरील सर्व कारणांचा विचार करुन वादीने मागितलेली दुरुस्ती ही नामंजुर करणेत यावी अशी विनंती केली.

६. वादीच्या व प्रतिवादी नं.५ च्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता सदर दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटप, कब्जा मिळणेकरीता आणि जाहीर होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी सदर अर्जाद्वारे गट नं.४८२ व गट नं.२१४ या मिळकती वादमिळकतीच्या कलमामध्ये समाविष्ठ करु इच्छित आहे, परंतु सदर मिळकतीमध्ये वादीस कोणता हिस्सा मागणेचा नाही. सदर वादीच्या अर्जानुसार वादीने गट नं.४८२ व २१४ मौजे पात्रेवाडी मधील हिस्सा अल्प असल्याने तो प्रतिवादी नं.१ यास सोडुन दिलेला आहे. केवळ तांत्रिक अडचण राहु नये म्हणुन सदर मिळकती वादी ह्या दाव्यात समाविष्ट करुन त्या मिळकतीमध्ये हिस्सा मागणेचा नाही याबाबतची दुरुस्ती करु इच्छित आहे.

७. वादीने दावा मिळकतीमध्ये जरी प्रस्तावित दुरुस्तीने गट नं.४८२ व २१४ समाविष्ट करुन त्यातील हिस्सा सोडुन दिला असा मजकुर समाविष्ट केल्यास त्याबाबत सविस्तर म्हणणे देण्याचा अधिकार प्रतिवादी यांना मिळणार आहे. वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असुन सदरची दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही अपरिमित असे नुकसान होणार नाही. सबब पुढील आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करावी.

३. संबंधित कारकून यांनी सदर दुरुस्तीची नोंद दावा नोंदणी रजिस्टरमध्ये व संगणक प्रणालीमध्ये दुरुस्ती करुन घ्यावी.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

५. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.08.01 17:52:09 +0530

आटपाडी. **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक– ०१/०८/२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | - A. A. Jamadar |
| Court | - Jt. CJJD and JMFC, Atpadi. |
| Date | - 01.08.2023 |
| Order signed by the Presiding Officer on | - 01.08.2023 |
| **Order uploaded on** | **- 01.08.2023** |